आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
ऑगस्ट २०२५ - वार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युवा, महिला आणि मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या व्यक्ती देशाला अमृत काळात आघाडीवर ठेवतील, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला व्यक्त

- स्वातंत्र्य दिनाची सर्वत्र जय्यत तयारी, उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लाल किल्ल्यावर ध्वजारोहण

- ४ किर्ती चक्र, १५ वीर चक्र, १६ शौर्य चक्रासह सैन्य दलांतल्या ४०० हून अधिक जणांचा राष्ट्रपतींकडून गौरव

- बिहारमध्ये मतदारयाद्यांमधून वगळलेल्या ६५ लाख लोकांची नावं प्रसिद्ध करायचे सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

**आणि**

- जम्मू काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीसदृश्य पावसामुळे २३ जणांचा मृत्यू, १०० हून अधिक जण जखमी

**<><><><><>**

युवा, महिला आणि मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या व्यक्ती देशाला अमृत काळात आघाडीवर ठेवतील, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज व्यक्त केला. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींनी देशवासीयांना संबोधित केलं. सामाजिक क्षेत्रातले विविध उपक्रम तसंच समग्र आर्थिक विकासामुळं २०४७ पर्यंत विकसित अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेनं भारत प्रयत्नशील असल्याचं त्या म्हणाल्या. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*सर्वसामान्यांचं आयुष्य, व्यापार-उद्योग सहज-सोपे व्हावे यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत, असं राष्ट्रपतींनी यावेळी नमूद केलं. मुख्य प्रवाहातून दूर राहिलेल्या व्यक्तींपर्यंत मदत पोहोचली, तरच नवीन संधी उपलब्ध होतात, असंही त्यांनी सांगितलं.*

***बाइट १***

*सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख राष्ट्रपतींनी केला. भ्रष्टाचाराला थारा न देता सुशासनाच्या आधारे सरकार काम करत आहे, याकडे त्यांनी आजच्या भाषणात लक्ष वेधलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्यदलांनी केलेल्या कामगिरीचं त्यांनी कौतुक केलं. यातून आत्मनिर्भर भारत मोहिमेचीही यशस्वी चाचपणी झाल्याचं त्या म्हणाल्या.*

***बाइट २***

*राष्ट्रपतींनी स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृतीही यावेळी जागवल्या. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या राज्यघटनेतल्या मूल्यांचा उल्लेख त्यांनी केला.*

***बाइट ३***

*जगातल्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा आर्थिक वृद्धिदर सर्वाधिक असून यात देशातले शेतकरी आणि कष्टकऱ्यांचं भरपूर योगदान आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.*

**<><><><><>**

देश एकोणऐंशिवा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. नागरिकांच्या उत्साहाला उधाण आलं असून नव्या आकांक्षा, नवी स्वप्नं आणि नव्या आशा यांचा जागर उद्या साजऱ्या होणाऱ्या या राष्ट्रीय सणाच्या निमित्तानं केला जात आहे. दिल्लीसह देशभरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ऐतिहासिक लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवतील आणि किल्ल्याच्या तटावरून देशाला

संबोधित करतील. स्वातंत्र्यदिनाची यंदाची मध्यवर्ती संकल्पना ‘नवा भारत’ अशी आहे. यंदा स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांमध्ये ऑपरेशन सिंदूरच्या यशावर विशेष भर असेल. विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या जवळपास पाच हजार नागरिकांना लाल किल्ल्यात होणाऱ्या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे.

<><><><>

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिन्ही सैन्य दलं आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांना १२७ शौर्य पुरस्कार जाहीर केले आणि २९० जणांना विशेष गौरव केला. यात ४ किर्ती चक्रं, १५ वीर चक्रं, १६ शौर्य चक्रं, ६० सेना पदकं, ६ नौसेना पदकं, २६ वायू सेना पदकं, ७ सर्वोत्तम युद्ध सेवा पदकं, ९ उत्तम युद्ध सेवा पदकं आणि २४ युद्ध सेवा पदकांचा समावेश आहे.

लष्करातले कॅप्टन लालरिनावमा सायलो, लेफ्टनंट शशांक तिवारी, लान्स नायक मीनातची सुंदरम आणि शिपाई जंजल प्रवीण प्रभाकर यांना किर्ती चक्रानं सन्मानित केलं जाईल. विंग कमांडर अभिमन्यू सिंग, पोलीस निरीक्षक रामेश्वर देशमुख यांच्यासह एकूण १६ जणांना शौर्य चक्रानं गौरवलं जाणार आहे. ब्रिगेडीयर मुदीत महाजन, रियर ॲडमिरल राहुल गोखले, विंग कमांडर दैवेंद्र औताडे, विंग कमांडर कुणाल शिंपी, विंग कमांडर चिंतामणी तेलंग, स्वाड्रन लीडर कौस्तुभ नलावडे, स्वाड्रन लीडर कौस्तुभ मुळे, मेजर अनुज महाजन, हवालदार विकास मेदाडे, हवालदार कैलास साखरे, लेफ्टनंट कर्नल भुपाल वाघ, नाईक तुलसीसिंग बागले यांनाही विविध सन्मान जाहीर झाले.

<><><><>

बिहारमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणानंतर मसुदा मतदारयाद्यांमधून वगळलेल्या ६५ लाख लोकांची नावं संकेतस्थळावर जिल्हानिहाय प्रसिद्ध करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज निवडणूक आयोगाला दिले. ही नावं का वगळली, हेसुद्धा यात नमूद करावं, ओळखपत्र

क्रमांकानुसार ही कागदपत्रं शोधता यायला हवीत, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं. ही यादी बिहारच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करायची आहे. तसंच अंतिम यादीत समाविष्ट करण्यासाठी या व्यक्तींनी अर्ज केल्यानंतर पुरावा म्हणून आधार कार्ड ग्राह्य धरावं असे निर्देश न्यायालयानं आयोगाला दिले. नावं वगळलेल्यांची यादी आणि कारणं प्रसिद्ध केली तर जनतेचा निवडणूक आयोगावरचा विश्वास वृद्धिंगत होईल, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

बिहारमध्ये येत्या १७ ऑगस्टपासून सुरू मतदार अधिकार यात्रा सुरू करण्याची घोषणा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज केली. मतदार याद्यांमधल्या गैरप्रकारांविरुद्ध आणि राज्यघटना आणि लोकशाहीच्या रक्षणासाठीची ही निर्णायक लढाई असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या व्हिडिओ संदेशात नमूद केलं.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये किश्तवाड जिल्ह्यातल्या चसोटी इथं झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसात २३ जणांचा मृत्यू झाल्याची भीती असून १०० पेक्षा जास्त लोक जखमी झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात मालमत्तेचंही नुकसान झाल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर इथली मच्छेल माता यात्रा स्थगित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या इथं तैनात करण्यात आल्या असून मदत आणि बचावकार्य सुमारे २० दिवस चालेल, असा अंदाज संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं. ही घटना चसोटी तीर्थक्षेत्र परिसरात झाल्यानं मच्छेल माता यात्रा स्थगित करण्यात आली आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू काश्मीरचे राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासोबत चर्चा करुन शक्य ती सगळी मदत करायचं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

S&P Global या पतनिर्धारण संस्थेनं भारताचं दीर्घकालीन कर्जासाठीचं पतमानांकन BBB मायनस वरुन BBB केलं आहे. लघुकालीन कर्जासाठी हे मानांकन A3 वरुन A2 स्थिर असं करण्यात आलं आहे. जानेवारी २००७ नंतर पहिल्यादांच S&P Global नं या मानांकनात सुधारणा केली आहे.

**<><><><><>**

भारताविरुद्ध युद्धखोर, द्वेषपूर्ण आणि निष्काळजी वक्तव्यं करणं ही पाकिस्तानच्या नेत्यांची सवय असून पाकिस्ताननं केलेल्या कोणत्याही आगळिकीला सडेतोड उत्तर दिलं जाईल, अशी ग्वाही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. अशी आगळीक केल्यास त्याचे काय परिणाम होऊ शकतात, हे भारतानं अलिकडेच दाखवून दिलं आहे, असंही ते म्हणाले.

**//<><><><><>//**